# राष्ट्रीय उत्पन्नाच्या काही मूलभूत संकल्पना

डॉ. रजनी सोनटक्के

अर्थशास्त्र

# राष्ट्रीय उत्पन्नाशी निगडित काही मूलभूत संकल्पना पुढीलप्रमाणे

- **१. उपभोग्य वस्तू: CONSUMPTION GOODS**

**"उपभोग्य वस्तू म्हणजे आपली इच्छा किंवा गरज पूर्ण करण्याकरितां उपभोक्त्याद्वारे उपभोग केली जाणारी वस्तू होय."**

उदा. ब्रेड, बिस्किटे, अन्नधान्य, कापड, सायकल, पंखा, मोटार सायकल, टेलिफोन, टेलिव्हिजन इ. अंतिम वस्तू होत,.

कोणत्याही वस्तू चा उपभोग घेण्यासाठी त्या वस्तूचे प्रत्यक्ष सेवन करणे आवश्यक नाही तर त्या वस्तूमधील उपयोगीतेचा वापर केल्यानेही उपभोगाची क्रिया घडून येते.

उपयोगीतेचा वापर करणे म्हणजेच उपभोग होय.



# उपभोग्य वस्तूची वैशिष्ट्ये:




ोग्य वस्तूमधील मानवी गरजा पूर्ण करण्याची शक्ती म्हणजे उपयोगिता असते.

ोग्य वस्तू ह्या मूर्त वस्तू असतात. त्या डोळ्याने पाहू शकतो व स्पर्श ही करू शकतो.

ोग्य वस्तूवर उत्पादनाची पुढची प्रक्रिया केली जात नाही.

ी उपभोग्य वस्तू उपभोगाकरिता उपयोगी असतात तर काही वाप्रक्रिट उपयुक्त असतात.

ोग्य वस्तू निरनिराळ्या दर्जाच्या असतात उदा. उत्तम, मध्यम व हलक्या इ. म्हणूनच त्यांच्या किमती कमी-जास्त अ

ोग्य वस्तू चा वापर उपभोगासाठीच केला तर च ती उपभोग्य वस्तू होईल. परंतु अन्य कामासाठी उपयोग केला जात असेल तिला उपभोग्य वस्तू म्हणता येणार नाही. उदा. द्राक्ष ही उपभोग्य वस्तू होय पण तिचा वापर मद्य तयार करण्यासाठी केला असेल तर ती उत्पादक वस्तू होईल.

ी उपभोग्य वस्तू टिकाऊ स्वरूपाच्या असतात, त्यांचा वापर अनेक वर्षेपर्यंत करता येतो.उदा. सायकल, स्कुटर, टेलिव्हिजन इ.

# उपभोग्य वस्तूंचे प्रकारः

- १.**एक वापर किंवा  या टिकाऊ वस्तूः** काही वस्तूंचा एकदाच वसपर केल्याने त्याची उपयोगिता सम्पूष्टात येते, त्यामुळे तिचा पुन्हा वापर करता येत नाही, उदा. दूध, दही, फळे इ.
- **२.टिकाऊ उपभोग्य वस्तूः** काही उपभोग्य वस्तू टिकाऊ स्वरूपाच्या असतात, त्यांचा कार्यकाळ 5 ते 10 वर्षे असतो.अशा वस्तूंचा वापर अनेक वर्षांपर्यंत करू शकतो. उदा. सायकल, पंख, खुर्ची टेबल, टेलिफोन, स्कुटर इ. ह्या वस्तूंच्या वसप्रणे तयाची झीज होत असते.
- **३.नाशिवंत वस्तूः** ज्या वस्तू अगदी कमी वेळेकरिता टिकून राहू शकतात, परंतु नंतर उपयोगात आणता येत नसतील तर त्यांना नाशिवंत वस्तू म्हणतात.
- **४. सेवाः** सेवा ह्या वस्तू स्वरूपात उपलब्ध नसून ती वस्तूंपासून उपभोक्त्याना समाधान प्राप्त होत असते, त्यांना स्पर्ष करता येत नाही फक्त अनुभव करता येतो. उदा. शिक्षक, डॉक्टर, बँक इ.

- **भांडवली वस्तू : CAPITAL GOODS : “ ज्या वस्तूंचा वापर अन्य वस्तू अथवा सेवांच्या उत्पादनाकरिता केला जातो त्या वस्तूंना भांडवली वस्तू असे म्हणतात.”** उदा. यंत्र सामुग्री , उपकरणे, अवजारे, इमारत इ.
- भांडवली वस्तूनाच “ वास्तविक भांडवल” किंवा आर्थिक भांडवल असेही म्हणतात.
- भांडवली वस्तू या मानवनिर्मित वस्तू असून त्या टिकाऊ व मूर्त स्वरूपाच्या असतात. त्यांचा वापर वस्तू व सेवांची निर्मिती करण्यासाठी केला जातो. “मानव निर्मित अर्थोत्पादक वस्तू म्हणजे भांडवली वस्तू होत.”

१.ती वस्तू मानवनिर्मित असावी. म्हणजे मानवाने परिश्रम करून निर्माण केलेली असली पाहिजे. निसर्गाने विनामूल्य दिलेली असता कामा नये.

२. ती वस्तू उत्पादन कार्यासाठी उपयुक्त असली पाहिजे.

शेतकऱ्याचे लाकडी नांगर, शिंप्याचे शिवण यंत्र, डॉक्टर चे थर्मामिटर , कारखान्याची इमारत यंत्रसामुग्री व उपकरणे ह्या वस्तूंचा भांडवली वस्तूत समावेश करण्यात येतो.

# भांडवली वस्तूची वैशिष्ट्ये:

1. **मानव निर्मित –** ह्या वस्तू मानवाने निर्मित केल्या असतात.
2. **उत्पादनास आवश्यक-** भांडवली वस्तूमुळे उत्पादन कार्यास मदत होते.
3. **ऱ्हास पावणारे –** भांडवली वस्तू टिकाऊ असल्या तरी सतत वापर केल्याने त्यांची झीज होते. उदा. यंत्रसामुग्री, अवजारे इ.
4. **कार्यक्षमतेत वाढ-** भांडवली वस्तूच्या वापरामुळे कार्यक्षमतेत वाढ होते. उदा. हातमाग यंत्रावर कापड लवकर तयार करता येते.
5. **उत्पन्नाचे साधन-** टॅक्सी, मोटार, बस यासारख्या वस्तू भाड्याने देऊन उत्पन्न मिळविता येते.
6. **बचतीतून निर्मिती -** भांडवली वस्तू निर्माण करण्यासाठी बचत करणे आवश्यक असते.

# भांडवली वस्तूचे प्र

1. **मालकी हक्कानुसार**
   - वैयक्तीक किंवा खाजगी भांडवली वस्तू
   - राष्ट्रीय भांडवली वस्तू
2. **टिकाऊपणा नुसार :**
   - स्थिर भांडवली
   - फिरत्या भांडवली वस्तू
3. **गतीशीलतेनुसार :**
   - उपयोजित भांडवली वस्तू
   - तरत्या भांडवली वस्तू



# अंतिम वस्तू
# FINAL GOODS

- जी वस्तू उत्पादनानंतर उपभोक्त्याद्वारे इच्छा किंवा गरज पूर्ण करण्यासाठी वापरली जाते ती अंतिम वस्तू होय.
- अंतिम वस्तूचा शेवट उपभोगत होतो, म्हणून तिला "उपभोक्ता वस्तू "असेही म्हणतात.
- अंतिम वस्तूवर पुढची प्रक्रिया करावयाची नसल्याने तिला तयार वस्तू असेही म्हणतात.
- "जी वस्तू शेवटी उपभोकयाद्वारे वापरली जाते तिला पुढच्या उतपादन प्रक्रियेची मुळीच आवश्यकता नसते अशी वस्तू म्हणजे अंतिम वस्तू होय." उदा. ब्रेड, बिस्किटे, पेन ,पुस्तक, सायकल, पंखा

## अंतिम वस्तूची वैशिष्ट्ये:

1. अंतिम वस्तूवर उत्पादन प्रक्रिया पूर्ण झाली असते.
2. पुढील प्रक्रिया होत नाही,.
3. अशा वस्तू उपभोगासाठी तयार असतात.
4. अंतिम वस्तूची खरेदी उपभोक्त्याद्वारे उपभोगासाठीच केली जात
5. अंतिम वस्तूचा .उपभोग योग्य तर काही उत्पादन योग्य आसतात.
6. यांचा वापर अन्य वस्तूच्या उत्पादनाकरिता अर्धसिद्ध वस्तू म्हणून केला जाऊ शकतो.



# मध्यस्थ वस्तू
# INTERMEDIATE GOODS




- अंतिम वस्तू तयार करण्यासाठी ज्या वस्तूचा वापर केला जातो त्यांना मध्यस्थ वस्तू म्हणतात.
- मध्यस्थ वस्तूवर पुढची उत्पादन प्रक्रिया करूनच अंतिम वस्तू तयार केली जाते.त्यामुळे तयाना उत्पादक वस्तू म्हणतात.
- अर्धसिद्ध  वस्तू उत्पादन परिक्षेत्राच्या असतात.
- ज्या वस्तूंचा उत्पादन प्रक्रियेत वापर केला जातो त्यांना मध्यस्थ किंवा अर्धसिद्ध किंवा अर्धट्यार वस्तू म्हणतात. उदा. कच्चा माल, इंधन, वीज, सुटी उपकरणे इ.
- राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करतेवेळी त्यात केवळ अंतिम वस्तूचे मूल्याचे विचारात घेण्यात येते. मध्यस्थ वस्तूचे मूल्य विचारात घेतले जात नाही. कारण तयाचें मूल्य अंतिम वस्तूच्या मूल्यांमशे समाविष्ट केले जाते.

# अंतिम वस्तू आणि अर्धसिद्ध वस्तू यातील फरक
# DIFFERENCE BETWEEN FINAL GOODS AND MEDIATING GOODS

| अंतिम वस्तू | मध्यस्थ वस्तू |
|---|---|
| १. ह्या तयार वस्तू असतात | १. ह्या कच्च माळ किंवा अर्ध तयार वस्तू असतात,. |
| २. ह्या वस्तूंवर उत्पादनाची पूर्ण प्रक्रिया झालेली असते. | २. ह्या वस्तूंवर उत्पादनाची पुढची प्रक्रिया करावयाची असते. |
| ३. ह्या वस्तू उत्पादन परिक्षेत्राच्या बाहेर असतात. | ३. ह्या वस्तू उत्पादन परिक्षेत्राच्या आत असतात. |
| ४. ह्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतात. | ४. ह्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध नसतात. |
| ५. राष्ट्रीय उत्पन्नात समावेश होतो. | ५. राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जात नाही. |

# ५. सकल गुंतवणूक व घसारा
# GROSS INVESTMENT & DEPRECIATION

- **अर्थ : MEANING.** **"एक वर्षाच्या कालावधीत देशातील भांडवली सम्पत्ती च्या मुळात होणारी वाढ म्हणजे गुंतवणूक किंवा भांडवल निर्मिती होय."**
- उदा. नवीन कारखान्याची इमारत, संयंत्र आणि तंत्रसामुग्री, हत्यारे, अवजारे, कच्च माल तसेच यानरम वस्तू व मध्यस्थ वस्तूच्या साठ्यात होणारी वाढ इ. यालाच भांडवल निर्मिती असे म्हणतात.
- **केन्स च्या मते,** "भांडवली वस्तूच्या परिमाणात होणारी वाढ म्हणजे गुंतवणूक होय."
- **वित्तीय गुंतवणूक:** भांडवल निर्मिती बचतीतून होत असते, म्हणून ह्या बचतीचा उपयोग कम्पन्यांचे भाग, कर्जरोखे, इ. वित्तीय सम्पत्ती खरेदी करण्यासाठी केला जात असेल तर तिला " वित्तीय गुंतवणूक"म्हणतात. अशी गुंतवणूक वस्तू व सेवांच्या उत्पादनाला व रोजगाराला प्रत्यक्ष मदत करत नाही.

# वास्तविक गुंतवणूक :

## बचतीचा उपयोग जर यंत्रसामग्री, कच्चा माल, कारखान्याची इमारत इ. साठी केला जात असेल तर तिला “वास्तविक गुंतवणूक” म्हणतात.

- देशाच्या अर्थव्यवस्थेत होणारी वास्तविक गुंतवणूक खाजगी व सरकारी अशा दोन्ही क्षेत्रात होत असते.
- १. खाजगी गुंतवणूक: (PRIVATE INVESTMENT) – खाजगी गुंतवणूकित खलील खर्चाचा समावेश होतो.
- १. माल साठ्यावरील खर्च :
- २.यंत्रसामग्री व उपकरणावर कलेला खर्च,
- ३. इमारत निर्मितीवर केलेला खर्च
- 2. सरकारी गुंतवणूक: (GOVERNMENT INVESTMENT)
- सरकारी गुंतवणुकीत केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक सरकारे यांची गुंतवणूक असते. सरकारद्वारे कालवे, जलाशये, सडक, रेल्वे, वीज दूरसंचार, डाक खाते इ. वर खर्च केला जातो. सोबतच सरकार उपभोग्य व उत्पादक वस्तूंची सुद्धा निर्मिती करतात.
- खाजगी व सरकारी गुंतवणूक याना संयुक्तरित्या राष्ट्रीय गुंतवणूक म्हणतात.

# घसारा : DEPRECIATION

**“सम्पत्ती च्या वापरामुळे किंवा अन्य कारणामुळे सम्पत्ती च्या गन, मात्रा, मूल्यात होणारी एकसारखी पण कायमस्वरूपी जी घट होते तिलाच घसारा किंवा अवक्षयण म्हणतात.”**

## वैशिष्ट्ये:

1. घसारा म्हणजे सम्पत्ती च्या गन, मात्रा, मूल्यात होणारी घट होय.
2. घसारा सम्पत्ती च्या वापरामुळे किंवा अन्य कारणांमुळे होत असतो.
3. घसारा हळूहळू पण कायम स्वरूपाचा होत असतो.
4. घसाऱ्याचा सम्बन्ध स्थिर सम्पत्ती शीच असतो.
5. घसाऱ्यायामुळे स्थिर सम्पत्ती चे मूल्य कमी होते.

# सकल गुंतवणूक आणि निव्वल गुंतवणूक
## GROSS & NET INVESTMENT

- उत्पादन प्रक्रियेत यंत्रसामुग्री, अवजारे, इ. चा सतत वापर होत असल्याने कालांतराने यंत्रसामुग्रीचा काही भाग निकामी होतो व त्याजागी दुसरी यंत्रसामुग्री बसवावी लागते. ही नवीन खरेदी केलेली यंत्रसामग्री म्हणजेच सकल गुंतवणूक होय.
- या यंत्रसामग्री पैकी काही भाग जुन्या यंत्रसामग्री ची प्रतिष्ठापना करण्यासाठी खर्च होतो आणि शिल्लक राहिलेल्या भाग म्हणजे नवीन गुंतवणूक होय. यालाच निव्वल किंवा शुद्ध गुंतवणूक म्हणतात.
- घसारा किंवा प्रतिष्ठपणा खर्च वजा न करता केलेलीगुंतवणूक म्हणजे “सकल गुंतवणूक” होय.
- घसारा व प्रतिस्थापणेचा खर्च वजा करून येणारी गुंतवणूक म्हणजे “निव्वल किंवा शुद्ध गुंतवणूक” होय.
- निव्वल किंवा शुद्ध गुंतवणूक = सकल गुंतवणूक - घसारा

# सकल राष्ट्रीय उत्पादन
# GROSS DOMESTIC PRODUCT

- स्थूल राष्ट्रीय उत्पादनास एकूण राष्ट्रीय उत्पन्न असेही म्हणतात.
- एखाद्या देशात विशिष्ट कालखंडात ज्या अंतिम वस्तू उदा. कापड, साखर इ. आणि सेवांचे उत्पादन होते त्याची बाजारभवानुसार जी एकूण किंमत होते तिला स्थूल राष्ट्रीय उत्पादन म्हणतात.
- वस्तू आणि सेवांच्या उत्पादनासाठी यंत्रे, उपकरणे इ.सारख्या भांडवली मालमत्तेची जी झीज होते त्याला घसारा असे म्हणतात. स्थूल राष्ट्रीय उत्पादनात घसारा किंवा झीज विचारात घेतली जाते.
- **सूत्रः**

स्थूल राष्ट्रीय उत्पन्न = देशांतर्गत एकूण उत्पादन+देशातील व्यक्ती व संस्थांनी विदेशात मिळविलेले उत्पन्न – विदेशी व्यक्ती व संस्थांनी देशात मिळविलेले उत्पन्न

# निव्वल राष्ट्रीय उत्पादन
# NET NATIONAL PRODUCT (NNP)

- देशात एखाद्या विशिष्ट कालावधीत वस्तू आणि सेवांचे उत्पादन करण्यासाठी यंत्र, उपकरणे, इ. सारख्या भांडवली वस्तूंचा वापर करत असताना उत्पादन प्रक्रियेत भांडवली वस्तूंची जी झीज होत सये तिला घसारा म्हणतात . ही झीज भरून काढण्यासाठी जो खर्च करावा लागतो तो घसारा खर्च होय. स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा खर्च वजा केल्यानंतर जे उत्पादन मिळते त्याला निव्वल राष्ट्रीय उत्पादन म्हणतात.

- **सूत्रः**
- निव्वल राष्ट्रीय उत्पादन= स्थूल राष्ट्रीय उत्पादन - घसारा

# स्थूल देशांतर्गत उत्पादन
# GROSS DOMESTIC PRODUCT

- कोणत्याही  देशाच्या आंतरिक सीमेआंतर्गत एका कालखंडात उत्पादित सर्व वस्तू व सेवांच्या पैशात व्यक्त केल्या गेलेल्या मुलाला स्थूल देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात.
- अर्थव्यवस्थेच्या अनेक क्षेत्रात उत्पादनाची क्रिया सुरू असते, त्यात लोखंड, खते, गहू, तांदूळ इ. वस्तूंचे उत्पादन केले जाते. तसेच सरकारी उपक्रम, बँक, विमा व परिवहन इ. द्वारे सेवांची निर्मिती केली जाते. ह्या सर्व वस्तू व सेवांच्या बाजार किमतीच्या बेरजेला सकल देशाआंतर्गत उत्पादन असे म्हणतात.
- स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे आगणन ज्यावेळी बाजार किमतीनुसार केले जाते त्यावेळी त्याला बाजार किमतीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणतात( GDP AT MARKET PRICE).

# निव्वल किंवा(शुद्‌ध) देशाआंतर्गत उत्पन्न NET NATIONAL PRODUCT)

- सामान्य उत्पादन प्रक्रिया सुरू असताना अनेक भांडवली ववस्तूंचा जसे यंत्रसामुग्री, उपकरणे, अवजारे, ट्रकटर, फर्निचर, कारखाना व कार्यालयाची इमारत इ. चा वापर होत असतो. त्यामुळे त्यांची सतत झीज होत असते,. कालांतराने ह्या भांडवली वस्तूंची प्रतिस्थापना करणे आवश्यक असते. त्यामुळे एकूण उत्पादनांपैकी एक हिस्सा घसाऱ्यासाठी राखून ठेवावा लागतो. अशाप्रकारे स्थूल देशांतर्गत उत्पादनामधून घसारा खर्च वजा केला तर शिल्लक असलेल्या उत्पादनाला निव्वल किंवा शुध्द देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात..
- सूत्र :
- निव्वल देशांतर्गत उत्पादन =स्थूल देशांतर्गत उत्पादन – घसारा
- .
- = NDP =. GDP. -. DEPRECIATION

# दरडोई उत्पन्न
# PER CAPITA INCOME

- दरडोई उत्पन्न म्हणजे देशातील प्रत्येक व्यक्तीला मिळणारे सरासरी उत्पन्न होय. दरडोई उत्पन्नाची गणना करण्यासाठी देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील एकूण लोकसंख्येने भाग देऊन जो भागाकार येतो त्याला दरडोई उत्पन्न म्हणतात,.
- सूत्रः
- दरडोई उत्पन्न। = एकूण राष्ट्रीय उत्पन्न
- एकूण लोकसंख्या

# वैयक्तिक उत्पन्न
# PERSONAL INCOME

- “ वैयक्तिक उत्पन्न म्हणजे कोणत्याही देशातील व्यक्ती किंवा, कुटुंबाना एक वर्षाच्या कालावधीत वास्तविक रित्या मिळालेले उत्पन्न होय.”
- वैयक्तिक उत्पन्न हे नेहमी राष्ट्रीय उत्पन्नपेक्षा कमी असते.
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या राशीतून विविध कपाती वजा केल्यानंतर जी राशी शिल्लक राहते ते वैयक्तिक उत्पन्न होय.
- वैयक्तिक उत्पन्नाचे गणन। : खलील पदांच्या रकमा वजा केल्या जातात :
- १. कम्पन्यांचे आयकर:
- २. कम्पन्यांचे अवितरीत उत्पन्न : उत्पन्नाचा एक भाग भागधारकांना वाटून न देता त्याची व्यवसायात गुंतवणूक करणे. व हा भाग राष्ट्रीय उत्पन्नातून वजा करणे.
- ३.सामाजिक सुरक्षेसबंधी कपाती : भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन निधी इ. कपाती केल्या जातात.
- वैयक्तिक उत्पन्न। = राष्ट्रीय उत्पन्न- -कम्पन्यांचे आयकर। - अवितरीत व्यावसायिक नफा। - सामाजिक सुरक्षेच्या कपाती +हस्तांतरण शोधन

# व्यययोग्य उत्पन्न
# DISPOSABLE INCOME

- प्रत्यक्ष कराचे शोधन करून वैयक्तिक उत्पन्नाचा जो भाग शिल्लक राहतो त्याला वैयक्तिक उत्पन्न म्हणतात.
- व्यययोग्य उत्पन्न हा वैयक्तिक उत्पन्नाचा असा भाग आहे की जो प्रत्यक्ष कराचे शोधन केल्यानंतर लोकांजवळ शिल्लक राहतो.

1. व्यययोग्य उत्पन्न= वैयक्तिक उत्पन्न। - वैयक्तिक प्रत्यक्ष कर
2. व्यययोग्य उत्पन्न। = उपभोग। + बचत

-


THANKS!
shutterstock.com • 248970781